## प्रेसनोट

### पोलीस उन्नत दिनानिमित्त खंडणी विरोधी पथकाकडून कार्यक्रम आयोजित

महाराष्ट्र पोलीस उन्नत दिनानिमित्त पोलीस कार्यप्रणाली बाबतची माहिती सर्व सामान्य नागरीकांना देणेबाबत तसेच त्यांच्या अडीअडचणी समजून घेणेबाबतचे कार्यक्रम आयोजित करणेबाबत मा. पोलीस आयुक्त सो, रश्मि शुक्ला मॅडम, मा. पोलीस सह आयुक्त श्री. सुनिल रामानंद सो यांनी सुचना दिल्याने मा. प्रभारी अपर पोलीस आयुक्त, गुन्हे पुणे श्री. दिपक साकोरे सो, मा. पोलीस उप आयुक्त सो श्री. पी. आर. पाटील व मा. सहा. पोलीस आयुक्त गुन्हे- १ पुणे श्री. सुरेश भोसले यांचे मार्गदर्शनाप्रमाणे खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक लक्ष्मण बोराटे, सहा. पोलीस निरीक्षक सुनील गवळी, विठ्ठल शेलार व स्टाफने दि. ०३/०१/२०१७ रोजी टिंबर मार्केट येथील दि. पुना टिंबर मर्चन्टस ॲण्ड सॉ मिल ऑनर्स असोसिएशन व्यापा-यांची मिटींग घेतली. सदर मिटींगमध्ये खंडणी विरोधी पथकामार्फत करीत असलेल्या कामकाजाबाबत व्यापारी लोकांना माहिती दिली. दि. पुना टिंबर मर्चन्टस ॲण्ड सॉ मिल ऑनर्स असोसिएशनचे अध्यक्ष रतन किराड, उपाध्यक्ष अरविंद शहा, सचिव शंकरभाई पटेल तसेच इतर ४० ते ४५ व्यापारी लोक हजर होते. सदर व्यापा-यांकडून त्यांच्या कार्यपध्दतीबाबत माहिती घेतली, त्यांना येणा-या अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये सदर व्यापा-यांनी रात्रीच्या वेळी होणा-या भुरट्या चो-यांचा त्रास, तसेच उत्सवादरम्यान मंडळांच्या कार्यकर्त्यांच्या जबरदस्तीने जास्तीच्या वर्गणीची मागणी व इतर समस्या उपस्थित केल्या, तेव्हा त्यांनी त्यांच्या वरील समस्यांबाबत असोसिएशनच्या माध्यमातून किंवा वैयक्तीकपणे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याचे त्यांना आश्वासन दिले आहे.


पोलीस आयुक्तालय, पुणे शहर
खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा पुणे शहर
आयोजित मार्गदर्शन शिबीर